# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/02/2023 (शनिवार) दुपार

## चोरी

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०.५ कि.मी. अंतरावरील सावनेर बसस्टॉप जवळ येथे दिनांक २२/०२/२०२३ चे २१.१५ वा. ते २३/०२/२०२३ चे ९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुमुख सुर्यकांत लाखनी, वय ४१ वर्ष, रा. चर्च रोड मेन रोड सावनेर यांचे योगेश किराणा दुकान असून दि. २२/०२/२०२३ रोजी दुपारी १६.०० वा. दरम्यान त्याला ट्रॅक्टर क्र. एम. एच—३१ डब्लु—७८९७ घेवून सोनखांब ता. काटोल येथे सोयाबीन तेल आणण्याकरिता पाठविले होते. धरमकाटा सोनखांब येथील ट्रॅक्टरचे वजन केले असता ६ टन ३९० किलो भरले होते. घटना वेळी व ठिकाणी ट्रॅक्टर वरील ड्रायव्हर नामे— ईरशाद शेख रा. केळवद यांनी ट्रॅक्टर हे सावनेरला आणून ठेवलेले होते. त्याच्या तर्फे केळवद धरमकाटा येथे वजन केले असता ते वजन ६ टन १२० किलो वजन भरले होते. यातील आरोपी नामे— १) ईरशाद शेख २) पुरूषोत्तम गभणे ३) महेंद्र गेडाम रा. तिन्ही राहणार केळवद यांनी संगणमत करून योगेश किराणा दुकाना समोरील ट्रॅक्टर उभा असता ट्रॅक्टर क्र. एम एच—३१ डब्लू ७८९७ त्यामधील २७० किलो सोयाबीन तेल किंमती अंदाजे ३५,१००/— रूपयाचा मुद्देमाल सोयाबीन तेल चोरून नेले आहे व अंदाजे २५,०००/—रु. चे नुकसान झालेले दिसले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३८१, ४०६, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुभाष राठोड हे मो. नं. ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

## आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत ०८ किमी अंतरावर मौजा तामसवाडी येथे यातील **मृतक नामे— शेषराव दाजीबा गेडाम वय ४० वर्ष, रा. इंदीरा नगर वार्ड नं. ३ तामसवाडी** व आरोपी नामे— ०१) नागसेन उर्फ नागो गुरूदेव चव्हाण वय ४४ वर्षे ०२) सौ. सिमा नागसेन चव्हाण वय ३६ वर्षे दोन्ही रा वार्ड क्र. ०३ तामसवाडी ता. पारशिवनी यांचे घर आमोरासामोर असून यातील मृतकने दिनांक १०/०३/२०२२ रोजी १५.३० वा. ते १६.०० वा. दरम्यान त्याचे राहते घरी गळफास लावून आत्महत्या केली अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे मर्ग क्र. १३/२२ कलम १७४ जाफौ नुसार दाखल आहे. यातील आरोपीतांनी यातील नमूद घटना वेळी व ठिकाणी मृतक यास मानसिक त्रास देवून त्याला अपमानित करण्याचे हेतूने मारहाण केल्याने तसेच त्यास आत्महत्येस प्रवृत केल्याने मृतकाने आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— संदीप दाजीबा गेडाम, वय ३१ वर्ष, रा. इंदिरा नगर वार्ड क्र. ०३ तामसवाडी ता. पारशिवनी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०६, ३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपी क्र. १) याला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बासोडे पोस्टे पारशिवनी मो. नं. ९८२३०८३९०५ हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. सावनेर :– फिर्यादी नामे– सौ वंदना अचलकुमार बेलवंशी, रा. गायकि ले आउट सावनेर व आरोपी नामे– अचलकुमार मदनलाल बेलवंशी, रा. गायकि ले आउट सावनेर हे पति पत्नी असुन त्याचे दिनांक ०३.१२.२०२० रोजी रितीरीवाजा प्रमाणे लग्न केले होते त्यानंतर फिर्यादी व आरोपी यांचे कौटुंबिक वादविवाद असुन दि. ०८.०८.२०२२ रोजी त्यांना पंचायत समिती सावनेर येथे पति पत्नीचा वाद असल्याने आपसी समझोता झाला त्यानंतर नमुद आरोपी हे तन्नु विश्‍वकर्मा, रा. सावनेर एकमेका सोबत फोनवर बोलत होते फिर्यादीने १४.०१.२०२३ ला पोलीस स्टेशन सावनेर ला तक्रार दिली होती त्यानंतर दिनांक १९.०१.२०२३ ला महीला समुपदेशक केन्द्र पंचायत समिती सावनेर येथे आपसी समजुत करीता बोलविले होते परंतु फिर्यादी हिला वारंवार आरोपी याने शारीरीक मानसिक त्रास देवुन तिचा छळ करीत असल्याने महिला समुपदेशक पंचायत समिती सावनेर याचे लेखी पत्र दिल्याने त्याचे अहवाल नुसार व फिर्यादी यांचे तोडी रिपोर्टवरून सदर गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ४९८ (अ) भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार पांडे मो. नं. ७९७२४३१२३८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर